नियमित दिवाणी दावा क्र. १६/२०१२ मधील निशाणी १७० वर आदेश
CNR No.MHAK070001062012
(दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१)

१. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ८ यांनी त्यांचे विरुध्द निशाणी १ वर झालेले आदेश अपास्त करुन प्रतिवादी क्र. ८ ला लेखी जबाब दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. ८ यांचे कथन असे की, वादीने प्रतिवादींविरूध्द सरसनिरस वाटणी होणे बाबत इत्यादी करीता दावा दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये हजर होणे कामी प्रतिवादी क्र. 8 ला समन्स बजावण्यात आले होते. समन्स मिळाल्यानंतर प्रतिवादी क्रमांक 8 हे त्यांचे वकिलांना जावून भेटले व त्यांचेकडे दाव्याच्या प्रती दिल्या तेव्हा प्रतिवादी क्र. 8 च्या वकिलपत्रावर तसेच इतर दस्तावर सहया घेतल्या व सांगितले की, मी जेव्हा बोलावेल तेव्हा न्यायालयात हजर राहा. प्रतिवादी क्र. 8 यांनी त्यांचे वकिलांवर विश्वास ठेवला परंतु प्रतिवादी क्रमांक 8 ला त्यांचे वकिलांनी बोलाविले नाही व वरील प्रकरणाबाबत कोणतीही माहीती कळविली नाही. दिनांक 28.08.2021 रोजी प्रतिवादी क्र. 1 राजकुमार नारायण शर्मा व प्रतिवादी क्र. 8 यांची अचानक आठवडी बाजार बाळापूर येथे भेट झाली तेव्हा प्रतिवादी क्र. 1 यांनी प्रतिवादी क्र. 8 यांना वरील दावा विद्यमान न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याबाबत सांगितले. त्यावरून प्रतिवादी क्र. 8 हे दिनांक 02.09.2021 रोजी प्रकरणात हजर झाले व दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. 8 चे वतीने कामकाज पाहणे करीता वकिलांची नेमणूक केली. प्रतिवादी हे न्यायालयात हजर झाल्यानंतर दाव्याची व दाव्यामधील इतर दस्तऐवजांच्या प्रती निर्गमित केल्या तेव्हा सर्वप्रथम प्रतिवादी क्रमांक 8 ला माहीत पडले की अकोला येथील माननिय दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अकोला यांचे न्यायालयात दावा न्यायप्रविष्ट असतांना आणि तेथील वकिलांनी प्रतिवादी क्र. 8 यांच्या वकिलपत्रावर व इतर दस्तऐवजावर सह्या घेतल्यानंतरसुद्धा दाव्यामध्ये हजर झाले नाही. तसेच प्रतिवादी क्र. 8 यांना दाव्यात हजर राहून पुढील कारवाई करणे बाबत कुठलीही माहीती दिली नाही तसेच लेखी कळविले नाही.

३. त्यांचे पुढे असे कथन आहे की, वरील दाव्यामधील वाद शेत गट नंबर 141 मधील 1 हे 16 आर शेत प्रतिवादी क्र. 8 यांनी प्रतिवादी क्रमांक 1 पासुन दिनांक 24.01.2005 रोजी नोंदणीकृत खरेदी खताने विकत घेतले आहे. तेव्हापासुन सदर शेत प्रतिवादी क्र. 8 हे मालक म्हणून वहीती करीत आहेत. वाद हा शेती बाबत आहे. प्रतिवादी क्र. 8 यांचे आधीचे वकिलांनी दाव्यामध्ये कुठलीही कारवाई केली नाही. प्रतिवादी क्र. 8 यांनी त्यांचे आधीचे वकिलांचे सांगण्यावर विश्वास ठेवला व ते प्रतिवादी क्र. 8 ला दाव्याचे प्रोग्रेसबाबत माहीती देतील याची वाट पाहली परंतु प्रतिवादी क्र. 8 चे आधीचे वकिलांनी प्रतिवादी क्र. 8 ला सांगितल्या प्रमाणे दाव्याबाबत कुठलीही कल्पना दिली नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. 8 हे दाव्यात लेखी जवाब दाखल करू शकले नाही.

४. त्यांचे पुढे असे म्हणणे आहे की, वादाचे स्वरूप पाहता बाद हा स्थावर मिळकती बाबतचा असल्यामुळे प्रतिवादी क्र. 8 ला दाव्यामध्ये हजर होवून लेखी जबाब व दाव्या संबंधी संपुर्ण कारवाई करण्याची संधी देणे अत्यंत न्याय व गरजेचे आहे. प्रतिवादी क्र. 8 यांना दाव्यामध्ये लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी न दिल्यास प्रतिवादी क्र. 8 यांचे कधीही भरून न निघणारे नुकसान होईल व प्रतिवादी हे न्यायापासुन वंचीत राहतील. प्रतिवादी क्र. 8 यांना दाव्यास लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी दिल्यास वादी तसेच इतर प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही उलट दावा हा गुणवत्तेवर निकाली काढणे सोयीचे होईल आणि न्यायापासुन कोणीही वंचीत राहणार नाही. प्रतिवादी क्र. 8 यांना लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी दिल्यास न्यायालय प्रतिवादी क्र. 8 यांचेवर दाव्यामध्ये पुढील कारवाई करणेकामी जे काही अटी लादतील त्या अटींचे व आदेशाचे प्रतिवादी क्र. 8 हे काटेकोरपणे पालन करण्यास तयार आहे. करीता प्रस्तुत अर्ज.

५. वादीतर्फे अर्जावर निशाणी १७१ वर लेखी जबाब दाखल करण्यात आला. त्यांनी अर्जाला विरोध केला व कथन केले की, सदर दाव्याच्या समन्सची प्रतिवादी क्र. ८ ला बजावणी सुध्दा झालेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. ८ हे वि. न्यायालयात हजर होवुन त्यांनी त्यांचा लेखी जबाब निशाणी– ३० प्रमाणे दि. ११/०८/२००५ रोजी दाखल केलेला आहे. तरी सुध्दा प्रतिवादी क्र. ८ यांनी कोणत्याही रेकॉर्डची शहानिशा न करता निशाणी– १ वर झालेला आदेश अपास्त करून

लेखी जबाब सादर करण्यास परवानगी मिळणेबाबत निरर्थक अर्ज सादर केलेला आहे. वास्तविकतः प्रतिवादी क्र. ८ चे विरुध्द कोणताही नो डब्ल्यु. एस. चा आदेश पारीत झालेला नाही व त्याचा लेखी जबाब निशाणी– ३० प्रमाणे अभिलेखावर दाखल आहे. तेंव्हा सदरहु अभिलेखाची पाहणी न करता विनाकारण सदरहु निरर्थक अर्ज सादर करून न्यायालयाचा महत्वाचा वेळ वाया घालविला आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणात वादी व प्रतिवादी यांचा अंतिम युक्तीवाद दाखल झालेला आहे. प्रस्तुत प्रकरण लांबविण्याच्या दृष्टीने सदरहु अर्ज दाखल केला असल्याचे दिसुन येत आहे. करीता प्रतिवादी क्र. ८ चा प्रस्तुतचा अर्ज रुपये १,०००/– कॉस्ट लावुन खारीज करण्यात यावा हि विनंती.

६. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा तोंडी युक्तीवाद ऐकला.

७. अभिलेख पाहता प्रतिवादी क्र. ८ यांना प्रकरणात सामील करण्याचा अर्ज मंजुर झाल्यानंतर त्यांना दाव्याचे समन्स काढण्याबाबत आदेश झाला होता. सदर आदेश दिनांक २४.०८.२००५ रोजी पारीत झाला. तत्पुर्वी प्रतिवादी क्र. ८ यांनी त्यांना प्रकरणात सामील करण्याच्या अर्जावर म्हणणे व वादीच्या अंतरीम मनाईहुकूमाच्या अर्जावर म्हणणे असे संयुक्त म्हणणे निशाणी ३० वर दाखल केले होते. दिनांक २४.०८.२००५ रोजीच्या आदेशानंतर दिनांक ०७.१०.२००५ रोजी निशाणी २४ वरील वादीच्या अंतरीम मनाईहुकूमाच्या अर्जावर प्रतिवादी क्र. ८ वर इतर पक्षांचे म्हणणे ऐकुन आदेश पारीत झालेला आहे. सबब, सदर अंतरीम मनाईहुकूमाच्या अर्जावर आदेश पारीत करतेवेळी प्रतिवादी क्र. ८ चे निशाणी ३० वरील संयुक्त म्हणणे लक्षात घेण्यात आलेले आहे. तदनंतर प्रतिवादी क्र. ८ याने निशाणी ३९ वर पुरसीस दाखल करून त्याने मनाईहुकूमाच्या निशाणी ३० वरील अर्जाला दिलेला जबाब हाच त्याचा दाव्याचा जबाब म्हणून समजण्यात यावा, असे कथन केले आहे. सबब, प्रतिवादी क्र. ८ ची लेखी कैफियत/लेखी म्हणणे हे निशाणी ३० व निशाणी ३९ द्वारे या न्यायालयासमोर यापुर्वीच अभिलेखावर आलेले आहे. निशाणी १ वर कोठेही प्रतिवादी क्र. ८ विरुध्द दावा विनाकैफियत चालविण्याबाबतचा आदेश पारीत झालेला नाही. अशा परीस्थितीत अभिलेखावर प्रतिवादी क्र. ८ ची लेखी कैफियत/लेखी म्हणणे आले आहे. सबब, आता प्रतिवादी क्र. ८ म्हणत असल्याप्रमाणे असा कोणताही आदेश अस्तित्वात नसल्याने

प्रतिवादी मागणी करत असल्याप्रमाणे असा अस्तित्वात नसलेला आदेश अपास्त करत येत नाही. प्रतिवादी क्र. ८ ची लेखी कैफियत/लेखी म्हणणे अभिलेखावर असल्याने पुन्हा लेखी कैफियत/लेखी म्हणणे सादर करण्याकरीता प्रतिवादी क्र. ८ ला मुभा देणे हे न्यायप्रक्रियेत बसत नाही. सबब, अर्ज खारीज होण्यास पात्र आहे. सबब, आदेश –

:आदेश:

१. अर्ज नामंजुर करण्यात आला.

२. अर्जाचा खर्च अर्जदारावर ठेवण्यात येतो.

CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI

Digitally signed by CHANDRADIP PRAVINCHANDRA RAGHUVANSHI
Date: 2021.11.30 13:40:38 +0530

बाळापूर. (चं. प्र. रघुवंशी)
दिनांक ३०.११.२०२१ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बाळापूर.

## C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shaikh Rafique Shaikh Rasheed |
| Court Name | : | C.J.J.D. & J.M.F.C., Balapur. |
| Date of Order | : | 30/11/2021. |
| Signed by Presiding Officer on | : | 30/11/2021. |
| Uploaded on | : | 30/11/2021. |

---------------------------------------------------------------------------------------------